




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ  Mob- 9822720784  Email- jansanchlan@gmail.com



वर्ष ३ रे | अंक : ७१८ . वा | रविवार | दि. २४ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# भाजप पदाधिकाऱ्यांमधील रोष प्रतापरावांना पडू शकतो भारी...

## प्रतापराव उभे राहिल्यास काम करणार नाही : भाजप पदाधिकाऱ्यांचा निर्धार

**भाग-14**

जनसंचलन/बुलढाणा

सातत्याने निवडणुका लढवून स्वतःचे राजकीय करियर मजबूत करणारे प्रतापराव हे गेल्या १५ वर्षांमध्ये सातत्याने भाजप पदाधिकाऱ्यांकडे दुर्लक्ष करीत राहिले. **भाजप पदाधिकाऱ्यांना त्यांनी कधीच महत्व दिले नाही. गेल्या दीड दशकात सातत्याने प्रतापरावांनी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना गृहित धरण्याचे काम केले. त्यामुळे आता भाजप कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले असून, प्रतापराव जाधव उभे राहिले तर आम्ही काम करणार नाही, असा निर्धार भाजपच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला आहे. नेमकी हीच बाब प्रतापरावांचा लोकसभेकडे जाणारा मार्ग अवरुद्ध करू शकते. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव वानखेडे यांचा एक व्हिडिओ सध्या जोरदार चर्चेचा विषय बनला आहे.** भाजप-शिवसेने (शिंदे गट) कडून येत्या एक-दोन दिवसांत उमेदवारी घोषित होण्याची दाट शक्यता आहे. सध्यातरी प्रतापराव हे आपली उमेदवारी पक्की असल्याचे मानूनच काम करीत आहेत. प्रतापराव कॉन्फिडंट असले, तरी त्यांच्या उमेदवारीच्या मार्गात अनेक असंतोष व नाराजीचे काटे पसरलेले आहेत. खास करून भारतीय जनता पक्षात. प्रतापराव जाधव तब्बल १५ वर्षांपासून बुलढाण्याचे खासदार आहेत. प्रत्येक वेळी प्रतापराव हे भाजप-शिवसेना युतीमुळे निवडून आलेले आहेत. निवडून येईपर्यंत प्रतापरावांना भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची गरज असते. परंतु एका निवडून आल्यानंतर सातत्याने प्रतापराव हे भाजपचे आमदार, जिल्ह्यातील नेते, पदाधिकारी या सर्वांकडेच दुर्लक्ष करीत असतात,असा भाजपमधून जोरदार आरोप होत आहे. एव्हढेच नाही तर जिल्ह्यातील भाजपच्या आमदारांनाही ते योग्य तो सन्मान देत नाहीत, विविध संस्थांवर भाजपचे कार्यकर्ते निवडून येऊ देत नाही असा सूर भाजपमध्ये जोरकसपणे उमटत आहे. म्हणूनच गेल्या सुमारे वर्षभरापासून जिल्ह्यातील भाजपमध्ये प्रतापरावांविषयी प्रचंड धूसफूस सुरू होते. कार्यकर्त्यांच्या या भावना केवळ राज्याच्याच नव्हे तर दिल्लीच्या भाजप दरबारी देखील पोहोचल्या आहेत. कार्यकर्त्यांच्या या तीव्र भावना पाहूनच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही महिन्यांपूर्वी बुलढाण्यात जोरदार घोषणा केली होती की, बुलढाण्याचा पुढील खासदार हा भाजपचाच असेल. तेंव्हापासून भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते जोरकसपणे कामाला लागले आहेत. एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे मात्र प्रतापराव हे आपल्या उमेदवारीबाबत फारच निश्चिंत असल्याचे दिसून येत आहेत. भाजपच्या केंद्रीय पदाधिकाऱ्यांनीही जेंव्हा जिल्ह्याचे दौरे केले. तेंव्हा प्रत्येक वेळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यासमोर हेच गाऱ्हाणे मांडले की, काहीही करा परंतु प्रतापराव जाधव यांना उमेदवारी देऊ नका. भाजपच्याही अंतर्गत सर्व्हेमध्ये प्रतापराव हे निवडून येणार नाहीत,असा निष्कर्ष असल्याची खात्रिलायक सूत्रांची माहिती आहे. या एकंदर परिस्थिती गेल्या काही दिवसांपासून प्रतापराव जणुकाही आपली उमेदवारी घोषित झाल्याच्या थाटात वावरत असून, ते परस्परपणे भाजप-शिवसेना पदाधिकाऱ्यांचे मेळावे घेत आहेत.नाही म्हणायला संजय कुटे यांच्यासारख्या ज्येष्ठ भाजप पदाधिकाऱ्यांनी प्रतापरांविषयी सॉफ्ट कॉर्नर दाखवला खरा. परंतु सर्वसामान्य कार्यकर्त्यांची भावना ही प्रतापरावांच्या विरोधातच जाते. नुकताच काही माध्यमांवर मेहकर येथील भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुनराव वानखेडे यांचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यात त्यांनी प्रतापराव यांच्यावर भाजपकडे दुर्लक्षितपणा केल्याचा आरोप केला आहे. एव्हढेच नाही तर प्रतापराव जाधव हे चांगलेच भ्रष्ट आहेत व नागरिकांची पिळवणूक करतात, भाजपच्या नेत्यांवर व कार्यकर्त्यांवर अन्याय करतात, भाजपचे लोकप्रतिनिधी निवडून येऊ देत नाही, असा गंभीर आरोप केला.प्रतापराव जाधव यांना उमेदवारी दिल्यास आम्ही त्यांचे काम अजिबात करणार नाही, असा संकल्प त्यांनी बोलून दाखवला. आता वानखेडे हे माध्यमांसमोर बोलले, परंतु अनेक भाजपचे पदाधिकारी हे माध्यमांसमोर आले नसले तरी त्यांच्याही भावना या वानखेडे यांच्यासारख्याच आहेत. प्रतापराव जाधव हे जितक्या वेळा निवडून आले, त्या प्रत्येक वेळी त्यांना भाजपचे कार्यकर्ते व भाजपचे मतदार यांचा टेकू लागतोच लागतो. जर हा टेकू नसला, तर प्रतापरावांचा लोकसभेकडे जाण्याचा मार्ग निश्चितपणे बंद होतो, हे जगजाहीर आहे. त्यामुळेच प्रतापरावांना उमेदवारी मिळणे सध्यातरी अवघड दिसत आहे आणि मिळालीच तर ते लोकसभेपर्यंत खरंच पोहोचतील का, यावर एक भलंमोठं प्रश्नचिन्ह आज उभं आहे. काहीही झालं तर भाजप नेतृत्वाने आपल्याच कार्यकर्त्यांच्या तीव्र भावनांचा तरी आदर ठेवावा, एव्हढीच अपेक्षा.

(मतदारांचा कानोसा...)




### विकासपुरुष यांचे व्हिजन...



**दिलेली वेळ व दिलेला शब्द राजकीय, शासकीय तसेच जिल्ह्यातील सर्वत्र नागरिकांनी अनुभवलेला आहे जिल्ह्यात सामान्य कार्यकर्ता ते पदाधिकाऱ्यामध्ये विकासपुरुष ज्यांनी कोणतीही राजकीय मदत नसतांना आज पर्यंत कुठला ही भेदभाव न करता सहकारक्षेत्राच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास करीत आहेत.व भाजपा पक्षातून तिकीट मिळाले तर जिल्ह्याचा विकास भरभराटीचा होईल. नेहमी मागासलेला जिल्हा संबोधल्या जाणाऱ्या शब्दांना कायम पुसल्या जाईल एवढे मात्र नक्कीच**

---


## जिल्हाधिकारी कार्यालयात शहिद दिनानिमित्त अभिवादन

जनसंचलन/बुलडाणा



जिल्हाधिकारी कार्यालयात शहिद दिनानिमित्त क्रांतीकारी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना अभिवादन करण्यात आले. नायब तहसीलदार संजय बंगाळे यांनी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नाझर गजानन मोतेकर, सांडू भगत, श्रीकृष्ण कुटे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी पुष्पार्पण करून अभिवादन केले.

## तातुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निर्बंध...



जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत तात्पुरते पक्ष कार्यालय स्थापन करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. त्यानुसार धार्मिक स्थळे, रुग्णालय, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक ठिकाणाजवळ तात्पुरती पक्ष कार्यालय स्थापन करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. निवडणूक प्रक्रिया योग्य वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील धार्मिक स्थळ, रुग्णालय किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांचा जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहे. जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन जिल्ह्यातील धार्मिक स्थळ, रुग्णालय किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाजवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. सदर आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील दिले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा मध्ये बार्टी तर्फे मोफत प्रशिक्षणाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक बुलडाणा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे व निटकॉन लि. यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसुचित जातीतील युवक युवतीसाठी अनिवासी निःशुल्क क्षमता वृध्दी प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत सर्टीफिकेट कोर्स इन सेल्फ एम्प्लॉयमेंट टेलर पात्रता ८ वी पास कालावधी ३ महिने, सर्टीफिकेट कोर्स इन कॅन्स्ट्रक्शन इलेक्ट्रिशियन, पात्रता १० वी कालावधी ३ महिने,सर्टीफिकेट कोर्स इन ऑप्टीकल फायबर टेक्निशियन पात्रता १० वी कालावधी ४ महिने, सर्टीफिकेट कोर्स इन मल्टीस्कील टेक्निशियन पात्रता १० वी पास, ४ महिने, सर्टीफिकेट कोर्स इन मोबाईल फोन हार्डवेअर रिपेअर टेक्निशियन ह प्रशिक्षण राबविले जाणार आहे. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास प्रतिमाह ४००० /- रुपये उपस्थितीनुसार विद्याव्‍तेन बार्टी तर्फे मिळेल. उपरोक्त क्षमता वृध्दी कार्यक्रम प्रशिक्षण हे अनिवासी असून सदर संपूर्ण खर्च बार्टी पुणे मार्फत करण्यात येईल. अनुसूचित जातीतील वयोगटात १८ ते ३५ मधील गरजू व इच्छूक पात्रता धारक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज व त्यानुशंगिक कागदपत्रासह सादर करावेत.संबंधित उमेदवारांनी मुळ कागदपत्रासह स्वःखर्चाने निवड कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे याची नोंद घ्यावी.प्राप्त अर्जामधून निकषाच्या आधारे अर्जाची छाननी करुन निवडक उमेदवारांना पात्रता प्रवेश परिक्षा व मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. पात्र उमेदवारांची यादी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. अपुर्ण असलेले तसेच मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतलेजाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी ज्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेशासाठी अर्ज केलेला आहे त्याची प्रवेश परिक्षा, मुलाखत व कागदपत्राची पडताळणी त्याच केंद्रावर होईल याची नोंद घ्यावी. इच्छुक उमेदवारांनी खाली दिलेल्या प्रशिक्षण केंद्रावर जावून प्रवेश निश्चित करावा. व निटकॉन संकेतस्थळावर Website: nit-com.org जावून ऑनलाईन अर्ज सादर करावेत. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रशिक्षण केंद्रावर व बार्टीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. प्रशिक्षण सुरु झाल्यानंतर उमेदवारास प्रशिक्षणास गैरहजर राहता येणार नाही. अथवा प्रशिक्षण सोडून जाता येणार नाही. एखाद्या अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षणार्थी संख्या मंजूर संख्येपेक्षा कमी पडत असेल तर तो अभ्यासक्रम सुरु होण्यास विलंब होवू शकतो. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे घटक कालावधी, स्थान व प्रवेश कामाबाबत सर्व अधिकार बार्टी संस्थेकडे राखीव असतील. अर्जासोबत जोडवायाची कागदपत्रे विहित नमुन्यातील फोटोसहित परिपुर्ण अर्ज, टी.सी, दहावी बारावी, आयटीआय, डिप्लोमा इ. प्रमाणपत्र, जातीचा दाखला, उत्पन्न दाखला बँक पासबुक, आधारकार्ड झेरॉक्स, डोमेसिअल, पॅनकार्ड, रेशन कार्ड, ४ पासपोर्ट साइज फोटो. प्रशिक्षण स्थळ :- एच.पी. गॅस गोडावून जवळ, मलकापूर रोड, रिलायन्स पेट्रोलपंपाच्या मागे, जवळ आहे

# हुंड्यासाठी लग्न मोडले, मुलाकडील पाच जणांवर गुन्हा

जनसंचलन/ नांदुरा



साखरपुडा झाल्यानंतर हुंड्यासाठी लग्न मोडल्याने सासरच्या पाच जणांविरोधात मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीनुसार, चिखली येथील नेहल किसनराव शेळके याचा विवाह नांदुरा तालुक्यातील वाडी येथील महादेव उखर्डा चिमकर (५४) यांच्या मुलीशी ठरला. साखरपुडा झाला. साखरपुड्यात नवरीच्या वडिलांनी उपवराला पाच ग्रॅम सोन्याची अंगठी दिली. लग्नाची तयारी धूमधडाक्यात सुरू असतानाच उपवर नेहल शेळके याने मुलीला फोन करून तुझ्या वडिलांनी तीन लाख दिले नाहीत, तर मी लग्न करणार नाही, असे सांगितले. नवरदेवाकडील मंडळी काहीच ऐकून घ्यायला तयार नसल्याचा आरोप मुलीच्या वडिलांनी तक्रारीत केला.

# पाचवी, आठवीच्या प्रश्नपत्रिका आता शाळास्तरावरच होणार

जनसंचलन/बुलढाणा


यंदापासून पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा, मूल्यमापन आणि पुनर्परीक्षा पद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा सराव होण्यासाठी नमुना प्रश्नपत्रिका राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. याच प्रश्नपत्रिकांच्या आधारे शाळास्तरावरच प्रश्नपत्रिका तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांनी यासंदर्भातील सूचना परिपत्रकाद्वारे विभागीय उपसंचालक, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था (डायट) प्राचार्य, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पाचवी व आठवीच्या वार्षिक परीक्षांबाबत राज्य नियंत्रण समितीची निवड केली आहे. शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित शाळांना पाचवी व आठवीच्या वार्षिक परीक्षेसाठीच्या प्रश्नपत्रिका राज्यस्तरावरून पुरविण्यात येतील, असे कळविण्यात आले होते. मात्र, शाळास्तरावर तयार करण्याबाबत शासन निर्णयात नमूद केले आहे. त्यामुळे नव्या सूचना देण्यात आल्या आहेत. सरावासाठी नमुना सराव प्रश्नपत्रिका मिळणार आहेत.

# सैलानी येथील नारळाची होळी पर्यावरण पूरकतेचा संदेश देणारी ठरावी-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा




जिल्ह्यातील सैलानी बाबा येथील प्रसिद्ध असलेले नारळाची होळी रविवार, दि. २४ मार्च रोजी होणार आहे. यात मोठ्या प्रमाणावर नारळाचा उपयोग करून होळी पेटविण्यात येते. ही होळी पर्यावरण पूरकतेचा संदेश देणारी ठरावी, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी व्यक्त केली आहे. सैलानी बाबाच्या यात्रेमध्ये होळीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर भाविक एकत्र येतात. या नारळाच्या होळीपासूनच येथील यात्रेला खऱ्या अर्थाने सुरुवात होते. या ठिकाणी असलेल्या दर्ग्याच्या ट्रस्टमार्फत खुल्या जागेवर होळी पेटवली जाते. या ठिकाणी कोणताही अनुचित प्रसंग होऊ नये, यासाठी परिसराची पाहणी करून योग्य सूचना देण्यात आल्या आहे. होळी हा सण एक प्रमुख उत्सवापैकी एक आहे. हा सण पर्यावरण पूरकतेचा संदेश देणारा ठरावा. सैलानी बाबाच्या यात्रेला येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणार आहे. त्यांना योग्य सुविधा पुरविण्यासाठी प्रशासनातर्फे उपायोजना करण्यात आली आहे. दरम्यान या भागाची पाहणी केल्यानंतर भाविकांसाठी पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करणे गरजेचे आहे. यासाठी ट्रस्टकडून १५, तर प्रशासनातर्फे दोन टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांच्या संख्येनुसार या ठिकाणी पाणीपुरवठा करण्यात येईल. यात्रेसाठी प्रशासनाने पूर्ण नियोजन केले आहे. गर्दीवरील नियंत्रणासाठी पोलीस चौकी, ट्रस्ट आणि प्रशासनातर्फे दर्गा आणि संदलच्या मार्गावर सीसीटीव्ही, तसेच सुरक्षेसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी कोणतीही आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे. या ठिकाणी आरोग्य पथकाची ही नियुक्ती करण्यात आली आहे. सैलानी बाबाच्या यात्रेमध्ये अनेक भाविक या ठिकाणी यात्रेदरम्यान भेटी देतात. नागरिकांनी या ठिकाणी श्रद्धा बाळगावी, तसेच अनिष्ट चालीरीती आणि परंपरांना बंद करीत चांगल्या प्रकारचे सौदार्हपूर्ण वातावरण ठेवावे. तसेच या ठिकाणी येणारे लहान मुले, महिला, वृद्ध यांची काळजी योग्य प्रकारे घ्यावी, यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.



*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोकसभा निवडणुकीत नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध...

**जनसंचलन/बुलडाणा**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी कार्यक्रम घोषित केला आहे. या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध घालण्यात आले आहे. याचे मुद्रणालयांनी काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्याच्या हितचिंतकांनी मुद्रणालयाच्या मालकाने आणि इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकांनी तसेच प्रकाशकांनी नमुना मतपत्रिका छापाई करताना इतर उमेदवाराचे नाव आणि त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे, हे निर्बंध घालण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३चे कलम १४४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहे. प्रत्येक व्यक्तीवर हे आदेश देणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश देण्यात आले आहे. पोलीस विभागाने सदर आदेश ध्वनीक्षेपकावर जाहीर करावे, असे आदेश देण्यात आले आहे

# रहदारीस अडथळा टाळण्यासाठी निर्बंधाची अंमलबजावणी - जिल्हाधिकारी किरण पाटील...

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीच्या कालावधीत रहदारीस अडथळा होऊ नये, यासाठी निर्बंध घालण्यात आले आहे. गैरसोयीसाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून राजकीय पक्ष, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीचे ठिकाण, रस्त्यावर निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर, पॉम्प्लेट, कटआऊट, होडींग, कमानी लावल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होवू शकणार आहे. तसेच अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (डीबी) नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून निवडणूकीचे साहित्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी,



रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होईल अशा पद्धतीने लावण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. सदरील आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

# गारपीटग्रस्तांच्या मदत वितरण सुरू

**जनसंचलन/ चिखली**

जिल्ह्यातील अवकाळी पाऊस आणि गारपिटीची मदत मंजूर झाली होती. ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरवात झाली असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात २२० कोटी ३४ लाख रुपयांची मदत याअंतर्गत जमा होणार आहे. दुष्काळ, अतिवृष्टी आणि गारपिटीची मदत मिळावी यासाठी अनेक संघटनांनी आंदोलने केली होते. यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दुष्काळ, अवकाळी व गारपिटीच्या मदतीसंदर्भात शब्द दिला होता. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील गारपीट व अवकाळी पावसाने बाधित असलेल्या २ लाख ७६ हजार ५७५ शेतकऱ्यांना २२० कोटी ३४ लाख रुपयांची मदत मंजूर झाली होती. ही मदत आता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या पिकांचे उत्पादन घटल्याने लागवडीसाठी लागलेला खर्चही निघाला नाही. त्यामुळे, शेतकरी संकटात सापडले आहे. पावसाच्या खंडामुळेही उत्पादनात मोठी झाली आदे

# शुल्लक कारणावरून मारहाण; ८ जणांवर गुन्हे दाखल

**जनसंचलन/ चिखली**

नवसाच्या कार्यक्रमात शुल्लक कारणांवरून झालेला वाद विकोपाला गेल्याने दोन गटात मारहाणीचा प्रकार स्थानिक गोरक्षणवाडीत २१ मार्च रोजी घडला. याप्रकरणात परस्पर विरोधी तक्रारींवरून पोलिसांनी ८ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. दोन दिवसांपूर्वी नवसाच्या कार्यक्रमात शुल्लक कारणावरून वाद झाला होता. हा वाद समोपचाराने मिटविण्यात आला होता. मात्र, २१ मार्च हा वाद पुन्हा उफाळून आल्याने मारहाणीची घटना घडल्यानंतर याप्रकरणी विलास अंकुश लष्कर (३६, रा. गोरक्षणवाडी) याने दिलेल्या फिर्यादीनुसार २१ मार्चला रात्री ९ वाजेच्या सुमारास घरी आराम करत असताना संजय राम अत्तार, अर्जुन आत्तार, नितीन अत्तार व सचिन अत्तार या चार जणांनी नवसाचा कार्यक्रमात आम्हाला शिवीगाळ का केली अशी विचारणा करून मारहाण केली. त्यात त्यांना जबर मार लागल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याच प्रकरणात हंसाबाई राम आतार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोन दिवसपूर्वी नवसाचे कार्यक्रमात झालेल्या किरकोळ वादाच्या कारणावरून २१ मार्चला रात्री साडेनऊ वाजता त्या दोन सुना, पती व लहान मुलांसह घरी होते. त्यावेळी रमेश उत्तम लष्कर, रवी अंकुश लष्कर, सुनील अंकुश लष्कर व विकास अंकुश लष्कर या चार जणांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांना शिवीगाळ करू नका असे म्हणाले असता



रमेश लष्कर याने गळा दाबला व रवी लष्कर यांनी त्यांच्या हातातील काठीने मला मारहाण केली तर सुनील लष्कर याने एका सुनेस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे करण्याची धमकी दिल्याची फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही गटातील ८ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# देऊळघाट जिल्हा परिषद सर्कल भाजपा युवा मोर्चाची संघटनात्मक बैठक संपन्न...

**जनसंचलन/बुलढाणा**



देऊळघाट जिल्हा परिषद सर्कल मधील भारतीय जनता युवा मोर्चा च्या प्रमुख पदाधिकारी कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक भारतीय जनता युवा मोर्चा नवनियुक्त बुलढाणा तालुकाध्यक्ष सतिश भाकरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. बैठकी दरम्यान युवा मोर्चाच्या व्यापक विस्तारावर संवादात्मक चर्चा करून आगामी काळात संघटन मजबूत करण्याचा सर्वानुमते संकल्प करण्यात आला. या बैठकीला देऊळघाट जिल्हा परिषद सर्कल मधील प्रमुख पदाधिकारी राजेश पाठक, सुरेश जंजाळ, भारत शेजोळ, गणेश काळवाघे, दिनकर जाधव, विजय हिवाळकर, रामू पैठने, बबन जाधव, प्रभाकर पैठने, इंद्रजीतसिंग दिघवा, सचिन सोनुने, अभिषेक भाकरे, आकाश सोनुने, अमोल वैद्य, हरी घुबे, शुभम पैठणे, भागवत भोपळे यांची उपस्थिती होती.

# देऊळगाव कुंडपाळ परिसरात चोरीच्या घटना वाढल्या गावात भीतीचे वातावरण

## पोलिसांनी रात्रीची गस्त घालण्याची परिसरातील ग्रामस्थांची मागणी

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

परिसरात गत काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तीन दिवसांपूर्वी नायबराव सरकटे यांच्या शेतातील शेतात चोरटे येऊन धमक्या देऊन गेले, तसेच सदर कुटुंबातील सदस्यांनी आरडाओरड केल्यामुळे शेजारील नागरिक धावून आले, मात्र अंधाराचा फायदा घेत चोरटे पसार झाले. तसेच २१ मार्चच्या रात्री साडेबाराच्या दरम्यान शुभम सरकटे हे विठ्ठल मंदिर परिसरातील भजन संपल्यावर घरी येऊन कपडे बदलून लघुशंकेसाठी घरामागे गेले असता माजी सरपंच केशव सरकटे यांच्या घरासमोर चोरटे दबा धरून असल्याचे दिसून आले. त्यांनी या चोरट्यांना हटकले असता चोरट्याने प्रतिकार करत अंगावरील बनियन फाडले व अंधाराचा फायदा घेत चोरटे गल्लीतून पसार झाले, आरडाओरडा केल्यानंतर शेजारील ग्रामस्थ जागी



झाले, परंतु चोरटे अंधाराचा फायदा घेत पळण्यात यशस्वी झाले. ही माहिती त्यांनी पोलिस पाटील आसाराम खोमणे यांना दिली, तसेच परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्ग ही शेतात काम करण्यास जात नाहीत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा लोकसभा हि जागा काँग्रेसला मिळावी या मागणीसाठी काँग्रेसपक्षाच्या कार्यकर्त्यांचे सामूहिक राजीनामे

## जिल्हाध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा लोकसभा हि निवडणूक आगळीवेगळी ठरण्याच्या मार्गावर आहे.मात्र अजून बुलढाणा लोकसभेसाठी ना महायुतीचा उमेदवार ठरला आहे.ना महाविकास आघाडीचा मात्र हे गणित जुळता जुळेना असे झाले आहे.या मध्ये प्रत्येक पक्ष आपला दावा ठोकत आहे. यामध्ये आता काँग्रेस पक्षाने सुध्दा आपला डावा ठोकला आहे.बुलढाणा लोकसभा हि जागा या वर्षी काँग्रेस पक्षासाठी सोडण्यात यावी व उमेदवार हा काँग्रेसचा असणार असा हि डावा त्यांनी केला आहे.या मागणीसाठी चक्क कार्यकर्ते व पदाधिकारी हे राजीनामे देणासाठी तयार झाले आहे.काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांना कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी निवेदन दिले आहे.निवेदनात दिलेल्या माहितीनुसार गेल्या १५ वर्षापासून लोकसभेची जागा ही ३ वेळा राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार पराभूत झाले.जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्ष बळकट आहे. प्रत्येक



गावामध्ये इतर पक्षापेक्षा काँग्रेस कार्यकर्तो मोठ्या प्रमाणात आहे. जिल्ह्यात जि.प. पं.स. न.प. सोसायट्या बाजार समित्या तसेच इतर राजकीय व शैक्षणिक व सामाजिक बाबी भरभक्कम असल्यामुळे सदर बुलढाणा लोकसभा ही काँग्रेस पक्षाला द्यावी इतर सर्व पक्षांमध्ये बळकट काँग्रेस पक्ष तळागळात रूजलेला आहे.त्यामुळे बुलढाणा लोकसभा ही काँग्रेस पक्ष जिंकू शकतो. जर आपण बुलढाणा लोकसभेची जागा काँग्रेस पक्षास न घेतल्यास आम्ही कुठल्याच निष्क्रीय उमेदवारांचे काम करणार नाही. तसेच मोताळा तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष गजानन मामलकर यांनी सुध्दा सामूहिक राजीनामा दिला आहे.त्याअनुषांगाने असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी जिल्हाध्यक्ष यांच्याजवळ राजीनामे दिले आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष जयेश पाटील,आकश निमसे,राजेश काकर, संतोष गरूडे, शैलेश दळवी,भारत शिरोळे, परमेश्वर काकर,सचिन काकर, उल्हास पाटील,चेतन काकर,स्वप्नील चतारे,भागवत काकर,अभिषेक खराटे,गणेश सोनवणे,सदाशिव काकर,विजय मख, विठ्ठल हिवाळेसह असंख्य कार्यकर्ते यांनी आपले राजीनामे या निवेदनाद्वारे काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्याकडे दिले आहे.

# आचारसंहिता कालावधीत आंदोलन करण्यावर निर्बंध...

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहे. सदरचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम घोषीत केल्यापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. त्यानुसार निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांतता, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निबंध घालण्यात आले आहे. जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. सदर आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील दिले आहे.

# शासकीय परिसरात मिरवणुका काढण्यास निर्बंध

जनसंचलन/बुलडाणा



जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४चा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. यात शासकीय कार्यालये आणि विश्रामगृह परिसरात मिरवणूक काढण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिल कार्यालय, तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारा उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणूकी संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटिंग, होर्डींग लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे, मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल, अशी कृती करणे नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हादंडाधिकारी म्हणून डॉ. किरण पाटील यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून सर्व शासकीय ठिकाणी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. सदर आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील दिले आहे.

# येळगाव येथील स्वस्त धान्य दुकानदारांच्या त्रासाला कंटाळले गावकरी...

## पावती न देता मालाचे करण्यात येते वाटप कोणाला कमी कोणाला जास्त गावकऱ्यांनी तहसीलदार यांच्याकडे केली तक्रार..

जनसंचलन/बुलडाणा

शासन जनतेसाठी राशन पुरविते मात्र काही लोक त्याला गालबोट लावत असल्याचे दिसून येत आहे.बुलढाणा तालुक्यातील येळगाव येथे हा प्रकार दिसून आला आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन टिमने या प्रकाराची पाहणी केली आहे.येळगाव येथे स्वस्त धान्य दुकानदार दुकान नं १०२ श्री बबनराव इंगळे यांची आहे. यांच्या मार्फत येळगाव गावात राशन वाटप करण्यात येत आहे.मात्र गावातील लोकांना हे राशन वेळेवर मिळत नाही तसेच शासनाने ठरवून दिलेल्या नियामाप्रमाणे सुध्दा देण्यात येत नाही.तसेच या माल घेतल्याची पावती सुध्दा दिली जात नसल्याची तक्रार गावकरी करत आहे.कित्येक लोकांना हा राशनचा मिळणारा माल गहू,तांदूळ हा कमी मिळत आहे.त्यामुळे अनेक कुटुंबांना या त्रासाला समोरासमोर जावे लागत आहे.गावात वयोवृध्द लोक राशन घेण्याकरिता येतात मात्र त्यांना काही कळत नसल्याकारणांमुळे मिळणारा माल हा कमी देण्यात येत आहे.तसेच काही लोकांना हाच माल जास्त स्वरूपात सुध्दा दिल्या जात



असल्याचे गावकरी यांचे म्हणे आहे. गावातील ब्रम्हानंद गडाख यांनी या गंभीर गोष्टीवर आवाज उठविला आहे. गडाख यांनी बुलढाणा तहसीलदार यांच्याकडे असंख्य गावकऱ्यांनी सह्या देत न्याय मिळण्याकरिता मागणी केली आहे.तहसीलदार यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958